दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## विधान परिषदेच्या ४ मतदारसंघाच्या निवडणुका जाहीर; १० जूनला मतदान

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- राज्यात सध्या लोकसभा निवडणुकीतील पहिला तीन टप्प्यातील मतदान पूर्ण झाले आहे. तर आणखी दोन टप्पे मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर आता राज्य विधान परिषदेच्या चार जागांसाठी देखील निवडणूक जाहीर झाली आहे. मुंबई, नाशिक आणि कोकण विभागात ही निवडणूक होणार आहे. यामध्ये मुंबई आणि कोकण पदवीधर मतदारसंघाचा तर मुंबई आणि नाशिक शिक्षक मतदार संघाचा समावेश आहे. या चारही मतदारसंघातील आमदारांचा कार्यकाळ ७ जुलै रोजी संपणार आहे.

विधान परिषदेतील पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठी १० जून रोजी मतदान होणार आहे. यामध्ये चार जागांचा समावेश आहे. विधान परिषदेमध्ये असलेल्या एकूण सदस्यांपैकी ७ सदस्य हे शिक्षक मतदार संघातील तर ७ सदस्य हे पदवीधर मतदारसंघातून निवडून येतात. यातील दोन पदवीधर मतदारसंघातील आणि दोन शिक्षक मतदार संघातील आमदारांचा कार्यकाल ७ जुलै रोजी संपत आहे. त्यामुळे या चार जागांसाठी निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार दहा जून रोजी राज्यात मतदान होणार असून १३ जून रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

(वर्ष ६३ वे अंक १२४) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. – ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार, दि.०९ मे २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)

# अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील

## शरद पवारांच्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणुकीनंतर अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसच्या आणखी जवळ जातील, तर काही पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील, असे वक्तव्य शरद पवार यांनी केले आहे. शरद पवारांच्या या वक्तव्यामुळे आगामी काळात विरोधकांच्या गोटातील काही पक्षांची पुर्नरचना होण्याचे संकेत मिळत आहेत. शरद पवार यांनी 'द इंडियन एक्सप्रेस' या इंग्रजी दैनिकाला दिलेल्या मुलाखतीत हे भाष्य केले.



या मुलाखतीत शरद पवार यांनी म्हटले की, पुढील दोन वर्षात विविध प्रादेशिक पक्ष काँग्रेससोबत अधिक समन्वयाने काम करतील. यापैकी काही प्रादेशिक पक्ष हे त्यांचे हित लक्षात घेऊन काँग्रेस पक्षात विलीन होतील, असा अंदाज शरद पवार यांनी वर्तवला. मग हाच निकष तुमच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरचचंद्र पवार पार्टी या पक्षासाठी लागू होईल का, असा प्रश्न पवार यांना विचारण्यात आला. यावर पवार यांनी सांगितले की, मला काँग्रेस आणि राष्ट्रवादी कोणताही फरक दिसत नाही, वैचारिकदृष्ट्या आम्ही गांधी, नेहरुंची विचारसरणी मानणारे आहोत, असे शरद पवार यांनी म्हटले.

मात्र, प्रादेशिक पक्ष काँग्रेससोबत एकत्र येण्याच्या प्रक्रियेबाबत मी आत्ताच काही सांगू शकत नाही. सहकाऱ्यांशी चर्चा केल्याशिवाय मी काहीही बोलणार नाही. वैचारिकदृष्ट्या आमचा पक्ष काँग्रेसच्या जवळचा आहे. परंतु, आमच्या पक्षाबाबत कोणतेही पाऊल उचलताना किंवा (पान ४ वर)

# इंडी आघाडीकडे नेता नाही, नियत नाही आणि धोरणही नाही!

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची जालन्याच्या सभेत टीका

जालना दि.८ (प्रतिनिधी)- ज्यांच्याकडे नेता नाही, नियत नाही आणि धोरणही नाही अशा इंडी आघाडीचे नेते पंतप्रधानपदही आळीपाळीने वाटून घेण्याच्या वाटाघाटी करत आहेत. दुसरीकडे गेल्या दहा वर्षांची यशस्वी कारकीर्द आणि पुढील पंचवीस वर्षांच्या देशाच्या प्रगतीचा स्पष्ट आलेख मांडणाऱ्या भारतीय जनता पार्टीचे दूरदर्शी नेतृत्व नरेंद्र मोदी या दोघांमधून नेता निवड करणारी देशाची जनता नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी बसवून देशाच्या समृद्धीची, विकासाची वाटचाल सुरू ठेवणार आहे, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी व्यक्त केला.

जालना मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी- महायुतीचे उमेदवार रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रचारार्थ झालेल्या प्रचंड जाहीर सभेत शाह बोलत होते. यावेळी इंडी आघाडी, राहुल गांधी, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका करत शाह यांनी विरोधकांच्या तुष्टीकरण धोरणाचे वाभाडे काढले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, ज्येष्ठ नेते आ.हरिभाऊ बागडे, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, खा.अजित गोपछडे, शिवसेनेचे नेते अर्जुन खोतकर, आ.नारायण कुचे, प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर, प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक आदी यावेळी उपस्थित होते.

शाह यांनी या सभेत मोदी सरकारच्या दहा वर्षांच्या यशस्वी कारकिर्दीचा संपूर्ण आलेखच जनतेसमोर मांडला. देशाच्या दृष्टीने ही निवडणूक



महत्वपूर्ण आहे. दोन्ही बाजूंनी सैन्य सज्ज आहे, आणि पुढच्या पाच वर्षे देश कोणाच्या हाती राहणार याचा निर्णय जनतेला करावयाचा आहे. एका बाजूला १२ लाख कोटींचे घोटाळे करणाऱ्या नेत्यांची इंडी आघाडी, आणि दुसऱ्या बाजूला आपल्या उभ्या कारकिर्दीत भ्रष्टाचाराचा एकही कलंक नसलेले नरेंद्र मोदी यांच्यातील ही लढाई आहे, असे शाह म्हणाले. झारखंड मध्ये इंडी आघाडीच्या एका मंत्र्याच्या पीए कडून ३० कोटींची रोकड पकडली गेली, पश्चिम बंगालमध्ये एका मंत्र्याकडून ५० कोटी जप्त केले गेले होते. एका मंत्र्याकडे साडेतीनशे कोटींचे घबाड सापडले, गेल्या दहा वर्षांत १२ लाख कोटींचे घोटाळे करणारी इंडी आघाडी आहे, तर दुसरीकडे २३ वर्षांपासून मुख्यमंत्री, पंतप्रधान असूनही, ज्यांच्या विरोधात एकही आरोप नाही, असे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत. एकीकडे थोडासा उन्हाळा वाढताच बँकॉकला पळणारे राहुल गांधी आहेत, तर २३ वर्षांत एकही सुट्टी न घेता अखंडपणे देशसेवा करणारे पंतप्रधान मोदी आहेत. या दोघांतून आपल्याला नेता निवडायचा आहे, असे ते म्हणाले.

जालन्याचे स्टील देशातच नव्हे, तर संपूर्ण (पान ४ वर)

## पुढील पाच दिवस विदर्भात अवकाळी पावसाचे ढग

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- एकीकडे राज्यात उष्णतेच्या पाऱ्याने नवे उच्चांक गाठले असताना, दुसरीकडे विदर्भात मात्र पुन्हा अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याचे चित्र आहे. तर आजपासून पुढील पाच दिवस विदर्भातील जवळ जवळ सर्व जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसासह गारपीट, विजांच्या कडकडाट ३०-४० प्रतितास सोसाट्याच्या वाऱ्याचा इशारा दिला आहे. तर पुढील दोन दिवस विदर्भात बहुतांश जिल्ह्यांना हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून बहुतांश ठिकाणी अवकाळी पावसाने अक्षरक्ष: धुमाकूळ घालत अनेकांचे मोठे आर्थिक नुकसान केले आहे. तर कुठे अनेकांना यात आपला जीव देखील गमवावा लागला आहे. अशातच आता पुन्हा अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आल्याने संकटाचे ढग आणखी गडत होण्याची चिंता व्यक्त करण्यात येत आहे. परिणामी, संभाव्य पावसाचा इशारा लक्षात घेता शेतकऱ्यांसह नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, अशा सुचनाही नागपूर प्रादेशिक हवामान विभागाच्या वतीने देण्यात आल्या आहेत.

## अदाणी-अंबानींशी राहुल गांधींची गूप्त डील; पंतप्रधान मोदींची टीका

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षावर जोरदार टीका केली. पंतप्रधान मोदी म्हणाले, काँग्रेस पक्षाने अदाणी आणि अंबानी यांच्याकडून मोठ्या प्रमाणात काळा पैसा गोळा केला असून हे पैसे घेतल्यानंतर काँग्रेसने त्यांच्यावर टीका करणे बंद केले आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी पंतप्रधान मोदी तेलंगणा आणि आंध्र प्रदेश राज्याचा दौरा करत आहेत. एका प्रचार सभेत बोलताना ते म्हणाले, 'तुम्ही मागचे पाच वर्ष पाहिले असेल की, काँग्रेसचे राजकुमार अदाणी आणि अंबानी यांच्या नावाचा जयघोष करत होते. मात्र निवडणूक जाहीर होताच अचानक त्यांनी अदाणी आणि अंबानी यांच्याविरोधात बोलणं बंद केलं आहे. दोन्ही उद्योगपतींकडून त्यांना किती बॅगा भरून काळा पैसा मिळाला? अदाणी-अंबानी आणि राहुल गांधी यांच्यात अशी कोणती डील झाली? ज्यामुळे आता एका रात्रीत राहुल गांधी यांचा दृष्टीकोन बदलला.'

राहुल गांधींच्या आरोपांना उत्तर देत असताना पंतप्रधान मोदींनी पहिल्यांदाच उद्योगपती अदाणी-अंबानी यांचे नाव घेतले आहे. भाजपा आणि पंतप्रधान



मोदी हे उद्योगपतींना धार्जिणे निर्णय घेत आहेत. शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात कर्ज लादून भांडवलदारांना कोट्यवधींची कर्जमाफी दिली, असा आरोप काँग्रेसकडून वारंवार केला जात होता.

दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या टीकेला उत्तर देत असताना काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी वाड्रा म्हणाल्या, 'राहुल गांधी अदाणी-अंबानी यांचे नाव घेतल नसले तरी ते रोज उद्योगपतींबद्दल बोलत आहेत. त्यांचे सत्य लोकांसमोर मांडण्याचा प्रयत्न राहुल गांधी करत आहेत. भाजपा आणि बड्या उद्योगपतींचे साटेलोटे असल्याचे आम्ही उजेडात आणत आहोत. पंतप्रधान मोदींनी आपल्या मित्रांचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ केले. दुसरीकडे उत्तर प्रदेशमध्यमे मोठ्या प्रमाणावर शेतकरी आत्महत्या करत आहेत. मात्र त्यांची कर्जमाफी केली जात नाही असे प्रियंका गांधी यांनी म्हटले आहे.

## शिखर बँक प्रकरणी एसआयटी चौकशी करा; याचिका दाखल

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य सहकारी बँक अर्थात शिखर बँक घोटाळा प्रकरणी आता एसआयटी चौकशी केली जावी, अशी मागणी करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात सादर करण्यात आली आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे शिखर बँक प्रकरण अजित पवारांचा पिच्छा काही सोडत नाही, असे चित्र तरी पाहायला मिळत आहे.

दरम्यान, सदर याचिका दाखल झाल्यानंतर न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या याचिकेवर सुनावणी करण्यास नकार दिलेला असला तरी दुसऱ्या खंडपीठापुढे दाद मागण्याचे याचिकाकर्त्यांना निर्देश दिले आहेत. मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडून दाखल करण्यात आलेल्या क्लोजर रिपोर्टनुसार बँकेच्या कामकाजाची नाबार्डनं साल २००७ ते २०११ दरम्यान तपासणी करण्यात आली. बँकेने उपलब्ध केलेल्या अहवालातील तपशीलाच्या पार्श्वभूमीवर जानेवारी २०१३ मध्ये बँकेच्या कामकाजाची चौकशी सुरू करण्यात आली. जानेवारी २०१४ मध्ये सहकार आयुक्तांना सादर केलेल्या चौकशीमध्ये दिलेल्या अहवालात बँकेचे नुकसान झाले असल्याचे म्हटले होते.

## इंडिया आघाडी सत्तेत आल्यानंतर राम मंदिराचे शुद्धीकरण करणार-नाना पटोले

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- २२ जानेवारी २०२४ या दिवशी प्रभू रामचंद्राच्या मूर्तीची अयोध्येतील राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, सरसंघचालक मोहन भागवत आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते ही प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. आता काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी असं म्हटलं आहे की इंडिया आघाडीची सत्ता आल्यानंतर आम्ही राम मंदिराचं शुद्धीकरण करणार. यामागचं कारणही त्यांनी सांगितलं आहे.

''नरेंद्र मोदी यांनी नगरमध्ये भाषण केलं. ते म्हणाले की काँग्रेसची सत्ता आली तर ते मी आणलेल्या योजना काढून घेतील. राम मंदिरही त्यात आलं असं ते म्हणाले. गहू आणि तांदूळ देतात ती योजनाही आमचीच आहे. आम्ही काही त्या योजना बंद करणार नाही. तसंच गरीबांना आम्ही प्लॅस्टिकचे तांदूळ देणार नाही. योग्य प्रमाणात अन्न, धान्य आणि साखर देणार. '' असा टोला नाना पटोलेंनी लगावला आणि राम मंदिराबाबत भाष्य केलं.

''आम्ही सत्तेत आल्यानंतर राम मंदिराचं शुद्धीकरण करणार आहोत. कारण आमच्या सनातन धर्माच्या चार शंकराचार्यांनी या विधीला विरोध केला होता. त्यामुळे चार शंकराचार्यांना आम्ही बोलवू आणि राम मंदिराचं शुद्धीकरण करुन घेऊ. तसंच त्या मंदिरात आम्ही राम दरबार स्थापन करु कारण आत्ता त्या मंदिरात राम दरबार नाही. मूळ जी मूर्ती बाजूला सारण्यात आली आहे. त्यामुळे आम्ही रामलल्लांचा दरबार मंदिरात सजवू. तसंच शंकराचार्यांच्या हस्ते आम्ही मंदिराचं शुद्धीकरण करु, कारण त्यांचंच हे म्हणणं आहे की जो विधी झाला तो धर्माला धरुन झाला नाही. आम्ही सुधारणा करु. धर्माच्या आधारावर सुधारणा करु, अधर्माच्या नाही. नरेंद्र मोदींनी केलं ते अधर्माच्या आधारावर सगळं केलं असाही टोला नाना पटोलेंनी लगावला.

## गुणरत्न सदावर्ते यांच्या दाम्पत्याचे तज्ञ संचालक म्हणून दोघांचेही एसटी बँकेवरील संचालकपद रद्द

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- गुणरत्न सदावर्ते दाम्पत्याला सहकार खात्याने मोठा दणका दिला आहे. गुणरत्न सदावर्ते आणि त्यांच्या पत्नी जयश्री पाटील यांचे एसटी बँकेवरील संचालकपद रद्द करण्यात आले आहे. ते या पुढे तज्ञ संचालक म्हणून दोघेही एसटी बँकेवर राहू शकणार नाहीत. बँकेच्या सभेत बेकायदेशीर मंजूर केलेले पोटनियम रद्द करण्याची नामुष्की आता संचालक मंडळावर आली आहे. या प्रकरणी एसटी कामगार संघटनेच्या संदीप शिंदेंनी तक्रार दाखल केली होती. त्या नुसार आता हा निर्णय घेण्यात आले आहे.

एसटी को-ऑपरेटिव बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर केलेले पोटनियम आता सदावर्ते यांना रद्द करावे लागणार आहेत. तसेच सदावर्ते दाम्पत्याचे संचालक पद देखील रद्द करण्याचा निर्णय सहकारी विभागाने घेतला आहे. त्यामुळे आता सदवर्ते दाम्पत्य यापुढे तज्ञ संचालक म्हणून बँकेवर राहू शकणार नाहीत. एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी याप्रकरणी सहकार आयुक्तकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेऊन गुणरत्न सदावर्ते यांना मोठा धक्का सहकार विभागाने दिला असल्याचे बोलले जात आहे. एस टी महामंडळाच्या बाहेरील लोकांना बँकेच्या संचालक पदावर ठेवण्याचा अधिकार सहकार विभागाने नामंजूर केला असल्याची माहिती देखील संदीप शिंदे यांनी दिली आहे.

## शरद पवार गट अन् ठाकरे गट काँग्रेसमध्ये विलीन होणार

### पवारांच्या विधानानंतर फडणवीसांचा दावा

जळगाव दि.८ (प्रतिनिधी)- लोकसभा निवडणूक किंवा पुढील दोन वर्षात अनेक प्रादेशिक पक्ष हे काँग्रेस बरोबर जातील किंवा त्यातील काही पक्ष हे काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा विचार करतील, असे मोठे विधान शरद पवार यांनी केले. त्यांच्या विधानाने राज्यात चांगलीच खळबळ उडाली. त्यावर आता भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी देखील प्रतिक्रिया देत ठाकरे गट व शरद पवार गट काँग्रेसमध्ये कधी विलीन होणार याची तारीखच सांगून दिली. तर शरद पवारांच्या पक्षाचे व ठाकरे गटाचे अस्तित्व संपण्यास जमा असल्याचा त्यांनी दावा केला आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शरद पवारांना आपलं अस्तित्व टिकवायचं असेल तर काँग्रेसमध्ये जावं लागेल. त्यांना आपला पराभव दिसू लागलाय. त्यामुळे येत्या ४ जूनपर्यंत शरद पवारांचा गट आणि उद्धव ठाकरे यांचा गट काँग्रेसमध्ये विलीन झालेला पाहायला मिळेल, असं सूचक वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी केलं.

पराभव जवळ दिसू लागल्याने शरद पवारांनी असे वक्तव्य केले आहे, ते अगदी सत्य देखील आहे. लोकसभेनंतर शरद पवारांची पार्टी आणि ठाकरेंची पार्टी काँग्रेसमध्ये विलीन होणार आहे. बाळासाहेबांनी सांगितलं होतं, ज्यावेळेस काँग्रेसची युती करण्याची वेळ येईल त्यावेळेस मी माझं दुकान बंद करेन. या निवडणुकीनंतर उद्धव ठाकरेंची शिवसेना काँग्रेस बरोबर विलीन होणार आहे, असे विधान देवेंद्र फडणवीस यांनी केले.

## आक्षेपार्ह पोस्टप्रकरणी जेपी नड्डांना बंगळुरू पोलिसांनी बजावला समन्स

बंगळुरु दि.८ (वृत्तसंस्था)- भाजपा अध्यक्ष जेपी नड्डा आणि पक्षाच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांना बंगळुरू पोलिसांनी समन्स बजावला आहे. भाजपा कर्नाटक युनिटने केलेल्या 'आक्षेपार्ह पोस्ट'बद्दल बेंगळुरू पोलिसांनी बुधवारी ही कारवाई केली आहे.

जेपी नड्डा आणि अमित मालवीय यांना या व्हिडिओच्या संदर्भात बेंगळुरू पोलिसांसमोर हजर राहण्यासाठी एका आठवड्याची मुदत देण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने मायक्रो-ब्लॉगिंग साइट एक्सला भाजपाच्या कर्नाटक युनिटने शेअर केलेली पोस्ट ताबडतोब काढून टाकण्यास सांगितले होते. त्यानंतर, पोलिसांनीही कारवाई केली.

भाजपा कर्नाटक खात्याकडून कायदेशीर चौकटीचे उल्लंघन करण्यात आले आहे.

याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाने सायबर विभागाला ही पोस्ट काढून टाकण्याचे निर्देश दिले होते. परंतु, तरीही ही पोस्ट काढून टाकण्यात आलेली नाही.

## सॅम पित्रोदांकडून इंडियन ओव्हरसीज काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा

नवी दिल्ली दि.८ (वृत्तसंस्था)- भारताच्या दक्षिणेत राहणारी लोक आफ्रिकन लोकांसारखे तर ईशान्य भारतातील लोक चीनी लोकांप्रमाणे दिसतात, असं विधान काँग्रेसेचे नेते सॅम पित्रोदा यांनी केलं होते. त्यांच्या या विधानानंतर मोठा वाद निर्माण झाला होता. दरम्यान या वादानंतर आता सॅम पित्रोदा यांनी इंडियन ओव्हरसीज काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली.

यासंदर्भात केलेल्या पोस्टमध्ये जयराम रमेश म्हणाले, सॅम पित्रोदा यांनी इंडियन ओव्हरसीज काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनीही त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे.

सॅम पित्रोदा यांनी द स्टेट्समनला दिलेल्या



मुलाखतीमध्ये भारताच्या लोकशाहीबाबत बोलताना, भारताच्या दक्षिणेत राहणारी लोक आफ्रिकन लोकांसारखे तर ईशान्य भारतातील लोक चीनी लोकांप्रमाणे दिसतात, असं विधान केलं होते. भारतात एका बाजूला ईशान्येकडील लोक चीनी दिसतात, पश्चिमेकडची लोक अरबांसारखी दिसतात, तर उत्तर भारतातील लोक कदाचित गोऱ्या पाश्चात्य लोकांसारखी आणि दक्षिणेतील लोक आफ्रिकन नागरिकांसारखे दिसतात. तरीही त्याचा आपल्या जगण्यावर काहीही परिणाम झालेले नाही. आपण सर्वच बंधू आणि भगिनींप्रमाणे एकत्र नांदत वैविध्यपूर्ण देश एकत्र ठेवू शकलो. असे ते म्हणाले होते.

## मतदान केंद्रातील व्हिडिओ रेकॉर्डिंग जतन करून ठेवा

### रविकांत तुपकरांची थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार

बुलढाणा दि.८ (प्रतिनिधी)- बुलढाणा लोकसभा मतदारसंघाची मतदान प्रकिया २६ एप्रिल रोजी पार पडली. मतदारांचा कौल मतपेटीत कैद झाला असून त्याचा अंतिम फैसला आता ४ जूनलाच होणार आहे. त्यामुळे अनेक उमेदवारांसह मतदारांनाही या निकालाची उत्सुकता लागली आहे. अशातच बुलढाण्यातील अपक्ष उमेदवार रविकांत तुपकर यांनी निवडणूक आयोगाकडे प्रत्येक मतदान केंद्रातील व्हिडिओ रेकॉर्डिंग जतन करावी, अशी मागणी केली आहे.

मतदानाच्या वेळी सर्व मतदान कक्षांमध्ये व्हिडिओ रेकॉर्डिंग करावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. मतदान प्रक्रियेचे झालेले व्हिडिओ रेकॉर्डिंग हा मतदान प्रक्रियेची वैधता ठरवणारा एकमेव पुरावा आहे. त्यामुळे प्रत्येक मतदान केंद्रातील व्हिडिओ रेकॉर्डिंग जतन (पान ४ वर)

## समाजसेवक भाऊराव पाटील

महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक व शिक्षणप्रसारक. सर्व जातिधर्माच्या गरीब ग्रामीण रयतेला आपल्या भगीरथ प्रयत्नांनी त्यांनी आधुनिक शिक्षणाची कवाडे खुली करून दिली; म्हणून अनेक विद्वान व बहुजन समाज आदराने आणि प्रेमाने त्यांना कर्मवीर म्हणू लागला. कुंभोज (जि. कोल्हापूर) या खेड्यात पायगोंडा व गंगुबाई या जैन दांपत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. एतवडे बुद्रुक (जि. सांगली) येथे प्राथमिक शिक्षण घेऊन पुढे ते कोल्हापुरात इंग्रजी सहावीपर्यंत शिकले. शाहू महाराजांच्या प्रभावाखाली त्यांच्यावर समाजसेवेचे संस्कार झाले. विद्यार्थिदशेतज सातव्या एडवर्ड बादशाहाच्या पुतळ्यास डांबर फासल्याच्या खोट्या आरोपावरून त्यांना तुरुंगवास सोसावा लागला. त्याला कंटाळून आत्महत्या करण्याचा त्यांनी प्रयत्न केला; परंतु पुढे त्यांची सुटका होऊन त्यांनी कोल्हापूर सोडले.

ओगले काच कारखान्याचे व पुढे किर्लोस्कर नांगराचे १९१४ ते १९२२ या दरम्यान ते विक्रेते होते. या काळात ठिकठिकाणी खेड्यांत हिंडल्यामुळे जनतेचे दारिद्र्य व शिक्षणाचा अभाव यांची जाणीव त्यांना झाली. त्यातून दुधगाव (जि. सांगली) येथे विद्यार्थ्यांसाठी त्यांनी आश्रम काढला. कराडजवळील काले या गावी त्यांनी पहिले वसतिगृह काढले (१९१९). तोच रयत शिक्षण संस्थेचा शुभारंभ होता. पुढे १९२४ मध्ये सातारा येथे अस्पृश्यांसह सर्व जातीधर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी वसतिगृह काढले. त्यास राजर्षी शाहू महाराजांचे नाव देण्यात आले. महात्मा गांधींनी या वसतिगृहास १९२७ साली भेट दिली. तेव्हापासून भाऊराव खादी वापरू लागले व राजकारणापासून दूर राहून शिक्षणाच्या कार्यास त्यांनी पूर्णतः वाहून घेतले. गोरगरीब पण हुशार मुले जेथे जेथे खेड्यापाड्यांत दिसतील, तेथून त्यांना उचलून आणून वसतिगृहात ठेवून पोटच्या पोरांप्रमाणे सांभाळले. त्यांतील काही विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षणाची सोय पालक या नात्याने त्यांनीच केली. 'स्वावलंबनाने कष्ट करून शिका', हा त्यांचा मंत्र होता.

वास्तविक भाऊराव बहुजनसमाजाच्या शैक्षणिक उद्धाराकडे वळले, त्याचे कारण सत्यशोधक चळवळीशी त्यांचा अत्यंत संस्कारक्षम अशा वयात आलेला निकटचा संबंध. या चळवळीतून बहुजनसमाजाच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळावयाची, तर तिचा रोख शिक्षण प्रसाराच्या द्वारा त्या समाजातील अनिष्ट रूढी व अंधश्रद्धा नष्ट करण्याकडे असणे आवश्यक होते. भाऊरावांनी शिक्षणकार्य पतकरून हे साधण्याचा नेटका प्रयत्न केला. या कार्यामुळे विरोधक व सनातनी मंडळींचा रोष होऊन त्यांना जाच सहन करावा लागला. स्वतःच्या मातापित्यांची व समाजाचीही इतराजी त्यांनी ओढवून घेतली. सर्व जातीधर्माचे आजन्म कार्यकर्ते सेवक या संस्थेत तयार झाले. रयत शिक्षण संस्था खऱ्या अर्थाने जनतेची झाली. वटवृक्ष हे बोधचिन्ह व स्वावलंबी शिक्षण हे संस्थेचे बोधवाक्य ठरले. भाऊरावांची पत्नी लक्ष्मीबाई यांनी त्यांच्या कार्यात मनःपूर्वक साथ दिली. त्यांना तीन मुले झाली; दोन मुली आणि एक मुलगा. संस्थेचे विद्यमान संघटक अप्पासाहेब हे त्यांचे चिरंजीव होत.

गांधींवधानंतरच्या उद्रेकात १९४७ साली संस्थेचे सरकारी अनुदान काही दिवस स्थगित करण्यात आले; पण कर्मवीर भाऊराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी बाणेदारपणाने लोकाश्रयावर संस्था पुढे चालविली व संवर्धित केली. कर्मवीर भाऊराव हे विलक्षण जिद्दीचे व धडाडीचे कार्यकर्ते होते. धिप्पाड शरीर, प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि गरीब, पददलितांचा अंतर्यामी जिव्हाळा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष होत. महात्मा फुले व राजर्षी शाहू यांची शिक्षणाप्रसाराची इच्छा त्यांनी पूर्ण केली. पुणे विद्यापीठाने त्यांना 'डी.लिट्.' ही सन्मान्य पदवी अर्पण केली. सद्गुरू गडगे बाबांचेही रयत शिक्षण संस्थेस अमोल साहाय्य झाले. हृदयविकाराने भाऊरावांचे पुण्यास निधन झाले. भगीरथ प्रयत्नांनी भाऊरावांनी खेड्यापाड्यांत ज्ञानगंगा नेऊन पोहोचविली. या संस्थेची ३१२ माध्यमिक विद्यालये व १९ महाविद्यालये आहेत. शिक्षणमहर्षी भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र आदरांजली!

# स्वाभिमानी व महान योध्दा महाराणा प्रतापसिंह

**मेवाडचे** महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी, मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहानभूक विसरून लढा दिला. मेवाडचे स्वतंत्र टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात तोड नाही. प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावीत झाला होता. त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानले जाते.भारतीय इतिहासात महाराणा प्रताप यांना मोलाचे स्थान आहे. कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्या काळी मुगल घाबरत असे. त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापांचा अभिमान आहे. महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह. मेवाड, बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले.पुढे उदयसिंह मेवाडचा राजा झाला.चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षानी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहाचे निधन झाले.यानंतर मेवाडचे सुत्र महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला.ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतीकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले.जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहचू नये,म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरीक केली.अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असतांना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रताप यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या



समशेच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी रजपूतांच्या पंक्तीला मी बसत नाही.मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा संग ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल.हे ऐकून मानसिंहच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईन. असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंग व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले.ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाले.राणाजींच्या वक्तव्य नेहमीच मानसिंहला खटकत होते.ही संपूर्ण घटना अकबराला मानसिंहाने सांगितली.पहिलेच मानसिंग तिलमिला झाला आणि अकबराला मेवाड पाहिजे होते या करीता अकबर सर्वत्र जहर घोळत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युध्द करायल निघाला. ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंगाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचशे सैनिक धाराशाही केले.दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते. महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला.महाराणा प्रतापांच्या भितीने मानसिंग आपल्या सैन्यासह पिछाडीवर रहाला.हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले. राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रताप जखमी झालेले पाहुन मानसिंह अत्यंत दु:खी झाला.आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली.प्रतापाचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले. मानसिंहाला महाराणा प्रताप समजून मोगलांनी आक्रमन केले.अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगतीला प्राप्त झाला.तेवढ्यात शत्रू सैनिकाने राणाजींच्या घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला.त्याचा पाय नीकामी झाला.अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला.आपला पाठलाग कोण करीत आहे हे पहाण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहाले.तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तिसिंग व त्यांचा बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता.राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन याच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली.मात्र तो महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही.हल्दिघाटीतील युद्ध हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानल्या जाते.शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमण करण्यास पाठविले.परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रताप यांना पकडू शकला नाही.अशा प्रकारे प्रबळ महत्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापाला नमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण तो निष्फळ ठरला.

२१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने)महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे.त्याकडे पहाणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात.१९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मालवली.भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते.महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम्!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# महाराणा प्रतापसिंह यांचे प्रेरणादायी चरित्र

**भार**ताला चारित्र्य संपन्नतेची महान परंपरा लाभलेली आहे. देशात महान थोर राजे महाराजे,थोर क्रांतिकारक क्रांतिवीर,महावीर होऊन गेले. ज्यांनी आपल्या कर्तृत्व संपन्न तेने भारतमातेचे रक्षण करून तिच्या प्रति अत्यंत प्रामाणिकपणे मातृभूमीचे पावित्र्य राखून शेवटच्या श्वास पर्यंत रक्षकांची भूमिका पार पाडली. सर्वात विशेष म्हणजे या महापुरुषांनी आपले चारित्र्य मंगलमय ठेऊन एक आदर्श संपूर्ण विश्वाला चारित्र्य संपन्नतेचा दर्शविला आहे,या भूमी पुत्रांना अनेक प्रलोभने दाखविण्यात आली पण त्यांना बळी न पडता ह्या विरानी प्रखर राष्ट्रनिष्ठा व राष्ट्रभक्ती ने भारावून त्या प्रलोभनाना ठुकरविले. 'मोडेन पण वाकणार नाही,' हा बाणा पाळणाऱ्या हिंदवी सूर्य महाराणा प्रताप सिंह यांचे नाव सर्वात वर आहे,त्यांच्या जीवनातील अनेक बाबी आजही तरुण युवक,शासनकर्ते,प्रशासन कर्ते, समाजकार्यकर्ते आणि देशवाशीयांसाठी प्रेरणा दायी व अनुकरणीय आहेत. राष्ट्रीय मूल्ये प्राणपलीकडे जपणारा राजा म्हणून महाराणा प्रतापसिंहकडे पाहिल्या जाते,आपल्या मातृ भूमीवर त्यांची प्रखर निष्ठा व श्रद्धा होती.ज्या भूमीवर जन्म घेतला. त्या भूमीचे रक्षण करणे, तिची स्वाधिनता अबाधित ठेवणे,हे आद्य कर्तव्य त्यानी मानले. राष्ट्रनिष्ठा राष्ट्रप्रेम, राष्ट्रभती त्यांच्या नसा -नसा त भरलेली होती. त्यांनी राष्ट्र हितापुढे व मातृभूमी पुढे सर्व बाबी तुच्छ मानल्या,राष्ट्रापेक्षा कोणीही मोठा नाही किंवा श्रेष्ठ नाही असे ते मानत आणि म्हणूनच महाराणा प्रतापसिंह म्हणजे राष्ट्रीय एकता, अखंडता, व बंधुताचे महान व आदर्श प्रतीक होत.

मानवी स्वाभिमानाचा पाठ संपूर्ण विश्वाला दिला,संपूर्ण विश्वातील मानव जातीला ताठ मानेने जगून, स्वाभिमानाने जीवन जगण्याचा पाठ महाराणा प्रताप सिंहानी मानव जातीला दिला. 'सर कट सकता है,मगर झुक नहीं सकता'हा बाणा महाराणा प्रताप यांनी शेवटच्या श्वास पर्यंत पाळला, त्यांचे असे मानने होते की,ज्या दिवशी मनुष्य आपला स्वाभिमान गमावून बसेल,त्या दिवशी तो मनुष्य मनुष्य नव्हे तर तो पशुसंम होईल. या साठी स्वाभिमान हा प्रत्येक व्यक्तीने जपायलाच हवा. देशासाठी सर्वस्व त्यागणार राजा महाराणा प्रताप सिह यांनी राष्ट्राला सवीच मानले. राष्ट्र पुढे सर्व बाबी तुच्छ आहेत असे त्यांचे मानाने होते,राष्ट्राच्या भल्यासाठीच व्यक्तींनी एकजुटीने



कार्य करून स्वाभिमानी जीवन जगावे असे त्यांचे माननेहॉटे, देशावर येणाऱ्या प्रत्येक संकटांचा सामना करण्यासाली, घर,संसार, सुख वैभवा चा त्याग करण्याची वेळ आली तरी चालेल परंतु राष्ट्रासाठी देशसेवेचे कर्तव्य प्रामाणिक पणे पडायला हवे असे त्यांचे मानणे होते.

आदीवासीच्या हृदयांत देशभक्ती मातृभक्ती जगविली महाराणा प्रतापसिंह यांच्या कडे मनुष्य बळ कमी होते म्हणून त्यांनी जंगलात राहणाऱ्या जनजाती,वआदिवाशींचे साहाय्य घेण्याचे ठरविले,महाराणा प्रताप यांनी आदीवासी च्या मनात देशाविषयी व मातृभूमी विषयी प्रेम व निष्ठा जागविली,आणिआदिवासींच्या या सहकार्य मुळेच ते मुघलांशी दीर्घकाळ लढा देऊ शकले ते आपल्या जीवनात कदापिही हताश-निराश झाले नाही,त्यांनी आदीवासी च्या सहकार्याने च मेवाडचे स्वातंत्र्य अबाधित राखले,आजही मेवाड येथे काही ऐतिहासिक स्मृती चे निरीक्षण केले तर तेथील चित्रात एकीकडे राजपूत तर दुसऱ्या बाजुला आदिवासी दिसतात.

मेवाडचे हे वैशिष्ट्य आजही दिसते, चारित्र्य संपन्न राजा महाराणा प्रतापसिंहहिंदवी सूर्य महाराणा प्रताप सिह यांचे चारित्र्य म्हणजे शुद्धता,निर्मलता, निष्कपट, निष्कलंकतेचे होय,महाराणा प्रताप सिंहाचे हल्दी घाटातील ते महापराक्रमी शौर्य पाहून अकबराने ,प्रतापशी भविष्यात युद्ध न करण्याचा निर्णय घेतला, हल्दी घाटीत महाराणा प्रताप यांच्या प्रत्येक शौर्याच्या कौशल्यातून मातृभूमी व राष्ट्रनिष्ट्ये चे दर्शन होते,

**महाराणा प्रताप यांच्या मनाचा मोठेपणा**

महाराणा प्रताप सिंह ह्या, खोश्यात व जंगलात राहिले परंतु त्यांनी आपल्या मानाचे नितीधैर्य खचू दिले नाही,महा-राणा प्रताप यांचे सुपुत्र अमरसिंह यांनी अकबराच्या खानखाना नावाच्या सरदाराच्या जनानखान्यातीळ महिलांना बदीस्त केले. हे प्रकरण महाराणा प्रतापाना कळल्यावर त्यांनी त्या सर्व बंदिस्त महिलांना माता भगिनी समजून अमरसिंह ला खडसावले व त्यांना मान सन्मानाने खानखाना कडे परत पाठविले हे भारतीय संस्कृतीचे आदरा तिथ्य पाहून खानखाना ने राणा प्रताव विरुद्ध तलवार न उचलण्याचा निणऱ्य घेतला, या सर्व बाबी पाहता महाराणा प्रतापसिंह याच्या जीवनातील प्रत्येक प्रसंगातून आदर्श अशा नितीतत्वांचे दर्शन घडते,जे आजच्या पिढीने स्वीकारावे अशी अपेक्षा असते,त्यांच्या स्मृतींना कोटी कोटी प्रणाम,

# राष्ट्रनिष्ठा आणि धैर्याचे प्रतीक- महाराणा प्रतापसिंह

**भारत** देश महान योध्याचा देश आहे. प्रखर राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम, जनप्रेम,व मातृभूमीला प्राणा पलीकडे जपणारे,योद्धे व राजे या भूमीतच जन्मले आहेत. त्यांच्या कर्तृत्व पराक्रमाने इतिहासाची पाने सुशोभित झालेली आहेत. अशा या योध्दात मेवाडचे महाराणा प्रतापसिंह यांचे नाव अग्रस्थानी आहे.

मोगल साम्राटाशी झुंजणारे, त्यांना जेरीस आणणारे, त्यांच्या सैन्याला आपल्या युद्ध कौशल्याने सळो की पळो करून सोडणारे महाराणा प्रतापसिंह म्हणजे देशाभिमान व स्वाभिमानाचे कणखर उदाहरण होय, मोगलांच्या मानाने अत्यंत कमी सैन्यबळ तुटपुंजी युद्ध सामुग्री, आर्थिक स्थितीही बेताचीच,परंतु एव्हढे सर्व तुलनेने कमी असतानाही त्यांनी आत्मविश्वास, धैर्य व जिद्दीने केलेला सामना व मिळविलेले विजय इतिहासाच्या पानांची आन,बान-शान वाढविणारे आहे. स्वकीयांचा धोकेबाजपणा, लबाडी,व खेकडावृत्ती यामुळे ही महाराणा प्रतापसिंह सारख्या महान योध्याला अनेक चढ उताराना सामोरे जावे लागले.

स्वकीयांनी मोगलांच्या दरबारी पत्करलेली लाचारी, गुलामगिरी व आप्तेष्टशी शत्रुत्व हे तत्कालीन परिस्थितीचे वास्तव चित्र होते. महाराणा प्रतापसिंह यांचा बाणा होता सर कट सकता है मगर झुक नहीं सकता' हा महाराणा सिंहाचा बाणा होता. त्यामुळे त्यांनी शत्रू पक्षाशी दोन हात करण्याची तयारी होती,अशा या महान योद्धयाच्या जीवनातील अनेक मूल्ये,त्यांची नीतिमत्ता,त्यांची स्वाभिमानी वृत्ती आजही आठवते. महाराणा प्रतापसिंह रानावनात राहिले. कंदमुळे सेवन केली. प्रसंगी गवताच्या भाकरी खाऊन पोटाची क्षुधा भागविली.पण मातृभुमीच्या रक्षणार्थ माघार व लाचारी पत्करली नाही, त्यांच्या मातोश्री जयवंतादेवी यांनी बालपणी त्यांना आदर्श शिक्षण, नैतीकतेचे पाठ शिकविले होते. १५७६च्या हल्दी घाटी युद्धात मोगलांच्या महिलांना कैदी बनविण्यात आले होते, त्यांनी संबधितास तात्काळ आदेश देऊन या महिलांना त्यांच्या कुटुंबियाकडे पाठवून दिले. शत्रूपक्षाच्या महिलांशी स्वतःच्या आई व बहिणी प्रमाणे वागावे असे आदेश त्यांनी आपल्या सैनिकांना दिले होतें, महाराणा प्रतापसिंहाचे चारित्र्य अत्यत मंगल व पवित्र होते. यामुळे महाराणा प्रतापसिंहांचे देहावसान झाल्यावर अकबराचे डोळे भरून आले, ' तेंव्हा तो म्हणाला'एक चारित्र्यवान राजपूताने या जगाचा निरोप घेतला,'

आदिवासी बांधवाना सोबत घेऊन मोगलांशी लढा-स्वकीय शत्रू पक्षाला जाऊन मिळाल्यावर राणा प्रतापसिंह यांनी देशाचे मूळ रहिवाशी यांच्या हृदयात देशभक्ती,राष्ट्रनिष्ठा व मातृभूमी प्रेम जागृत करून त्यांच्या सहाय्याने महाराणा प्रतापसिंह यांनी मोगलांशी दीर्घ काळ लढा दिला,महाराणा प्रतापसिंह यांनी राष्ट्रीय मूल्ये प्राणा पलीकडे जपली, त्यांनी राष्ट्रहित व मातृभूमी ला प्रथम प्राधान्य दिले,त्यांनी राष्ट्रहिता पुढे सर्व बाबी तुच्छ मानल्या. राणा प्रतापसिंह म्हणजे राष्ट्रीय एकता, अखंडता,बंधुता, व समतेचे आदर्श मानले जातात,स्वाभिमानाने जगण्याचा पाठ त्यांनी संपूर्ण जगताला शिकविला'सर कट सकता ,मगर झुक नही सकता'हे त्यांनी आपल्या स्वाभिमानाने जगताला दाखवून दिले,देश व मातृभूमी साठी सर्वस्व त्यागणारा महाराजा -महाराणा प्रतापसिंह यांनी राष्ट्राला सर्वस्व मानले. मातृभूमी रक्षण, देशावर येणाऱ्या प्रतेज संकटाचा सामना करण्यासाठी घर, सुख, वैभवाचा त्याग करण्याची वेळ आली तरी चालेल पण राष्ट्राहितासाठी एकजूट होऊन राष्ट्राप्रती प्रतेक घटकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडण्याचा पाठ त्यांनी देशवासीयांना दिला अशा महान योद्धया च्या स्मृतींना कोटी, कोटी प्रणाम.

**- धोंडीरामसिंह राजपूत**
न्यू सन्मित्र कॉलनी, लाडगाव रोड,वैजापूर जि.औरंगाबाद
मो.९४२१३१२२४४

# गोलवाडी येथे तेरापंथच्या भवनाचे लोकार्पण संपन्न




छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - एकदा खोटे बोलले तर ते लपविण्यासाठी अनेकदा खोटे बोलावे लागते. सत्य बोलल्याने व्यक्ती त्रस्त होऊ शकतो; पण पराभूत होत नाही. अंतिमतः सत्याचा विजय होतो. यामुळे खोटे बोलू नका, नेहमी खरे बोला. सत्य, अहिंसा, प्रेमभाव, मानवताच जगात 'शांती' निर्माण करू शकते, असा सत्यवादी जीवन जगण्याचा मंत्र, जैन श्वेतांबर तेरापंथ धर्म संघाचे ११वे आचार्य महाश्रमणजी यांनी दिला.

आचार्यश्री महाश्रमणजी यांच्या दर्शनासाठी लोकप्रतिनिधी धर्मसभेत आले होते. निवडणूक वातावरण लक्षात घेऊन आचार्यश्री म्हणाले की, प्रचारामध्ये विरोधकांवर आरोप करताना 'खोटे' आरोप करू नका. सत्यता असेल तरच आरोप करा. आचार्य महाश्रमणजींसह ८१ साधू संतांचे पदयात्रेने मंगळवारी गोलवाडीत आगमन होताच समाजातील अबालवृद्धांनी जयघोष करीत त्यांचे स्वागत केले. आचार्यश्रींच्या साक्षीने तेरापंथ भवनाचे लोकार्पण करण्यात आले.

यानिमित्त आयोजित धर्मसभेत सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्र दर्डा, मौलाना हाफीज अन्सारी, बिशप एम. यू. कसाब, न्या. के. यू. चांदीवाल, वारकरी संप्रदायाचे आंधळे महाराज, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक अनिल भालेराव, विश्व हिंदू परिषदेचे राजीव जहागीरदार, सकल मारवाडी महासभेचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम दरख, सकल जैन समाजाचे उपाध्यक्षांसह विविध व्यावसायिक संघटनांचे पदाधिकारी, समाजबांधव मोठ्या संख्येने हजर होते. प्रारंभी मुनीश्री दिनेशकुमारजी व साध्वी प्रमुखा विश्रुतविभाजी यांनी मार्गदर्शन केले. तेरापंथ युवक परिषदेच्या वतीने आचार्य महाश्रमण दीक्षा कल्याण महोत्सव विशेषांकाचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अवघ्या १११ दिवसांत तेरापंथ भवनची इमारत उभारल्याबद्दल आचार्यश्री महाश्रमण अक्षय्य तृतीया प्रवासव्यवस्था समितीचे अध्यक्ष सुभाषनहार ललीता नहार हर्षल नहार यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, पालकमंत्री संदिपान भुमरे, मंत्री अतुल सावे, आ. संजय शिरसाठ, आ. प्रदीप जैस्वाल, आ. प्रशांत बंब, शिवसेनेचे चंद्रकांत खैरे, माजी महापौर नंदकुमार घोडेले, बापू घडामोडे, राजेंद्र जंजाळ यांनी आचार्यश्रींचे आशीर्वाद घेतले.

'आचार्यश्री महाश्रमणजी फक्त तेरापंथ धर्म संघाचे आचार्य नव्हे, तर मानवतेवर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांचे ते आचार्य आहेत', असा उल्लेख राजेंद्र दर्डा यांनी केला. भवन उभारण्यात सहकार्य लाभल्याबद्दल सुभाष नहार यांनी सर्वांचे आभार मानले. महावीर पाटणी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अनिल नहार, सुनील राका, राजेंद्र डोसी, संजय सेठिया, महेंद्र सुराणा, कौशिक सुराणा, अंकुर लुणिया, राजकुमार बाठिया, तेरापंथ युवक परिषदेचे पदाधिकारी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# कर्मवीर भाऊराव पाटील आणि शैक्षणिक विचार

महाराष्ट्र-ची भूमी संत महंतांची तशी ती थोर समाजसुधारकांची सुद्धा आहे. तव्दतच या भूमीने थोर शिक्षण प्रेमी व थोर शिक्षण तज्ज्ञांनाही जन्म दिलेला आहे. शिक्षण हे व्यक्तीच्या अपेक्षित वर्तन बदलाचे प्रमुख साधन मानल्या गेलेले आहे. शिक्षणाशिवाय व्यक्तीचे जीवनात परिवर्तन नाही. शिक्षणाशिवाय व्यक्तींचा सर्वांगीण विकास ही शक्य नाही. शिक्षणाचे महत्त्व दोनशे वर्षापूर्वी तत्कालीन थोर समाज सुधारकांनी जाणले. समाजातील तळागाळातल्या घटकांना शिक्षण क्षेत्राची दारे बंद होती. शिक्षण नसल्यामुळे तळागळातल्या या जनसामान्यांचे जीवन अगदी तुच्छ लेखल्या जात होते. या घटकांना पशुतुल्य समजल्या जात होते. शिक्षण घेणे ही काही ठराविक लोकांचीच मक्तेदारी समजल्या जात होती. यामुळे पशु समजीवन जगणाऱ्या लोकांच्या व्यथा व कथा त्या काळच्या समाज हितचिंतकांच्या नजरेतून सुटल्या नाहीत. या दीन दुबळ्यांचे लाचारीचे जीवन बघून या समाज हितचिंतकांनी या जनसामान्यांसाठी शिक्षण मिळावे म्हणून शाळा उघडल्या. विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे उघडली. गोरगरीब व दीन दलित-दुबळ्यांच्या मुलामुलींसाठी शिष्यवृत्ती योजना आरंभ केली. दत्तक पालक योजना आरंभ केली. अशा थोर शिक्षणतज्ज्ञात कर्मवीर भाऊराव पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घेतल्या जाते.

'एकवर्षासाठी जगायचे असेल तर धान्य पेरा, दहावीस वर्षाची तरतूद करावयाची तर फळ झाडे लावा, शंभर वर्षासाठी तरतूद करावयाची असेल तर माणसे निर्माण करा,' असा महान संदेश देणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी वारणा नदीच्या काठावरील कुंभोज या गावी झाला. त्यांच्या कुटुंबाचा मुख्य व्यवसाय शेती होता. भाऊरावचे वडील पाईगोंडा पाटील यांचा आग्रह होता की, त्यांच्या मुलां-मुलींना चांगले शिक्षण मिळावे. त्यांनी आपल्या मोठ्या मुलाला म्हणजे भाऊरावला प्राथमिक शिक्षणपूर्ण झाल्यावर कोल्हापूरला पुढील शिक्षणासाठी पाठविले. कोल्हापूरला गेल्यावर भाऊराव सत्यशोधक समाजाच्या प्रभावाखाली आले. जातीच्या आधारावर लोकांमध्ये भेदभाव करणे पसंत नसलेल्या भाऊरावांना जोतीबांचे लेखन, विठ्ठल रामजी शिंदे यांचे विविध कार्य आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अस्पृश्यता निर्मूलनासाठी शाहू महाराजांनी सुरू केलेल्या जोरदार मोहिमेने प्रेरणा दिली.



कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वत:ला शिक्षण कार्यासाठी झोकून दिले. समाजातील दीन दुबळे दलित, शोषित, पिडीत आदी मुलींसाठी शिक्षणाची दारे उघडली आणि समाजातील प्रत्येकाला शिक्षण मिळालेच पाहिजे, अशी महात्मा फुलेंची परंपरा पुढे चालविली.

**१९१९ साली रयत शिक्षण संस्था स्थापन केली-** भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागातील जनतेच्या दारिद्र्याची व गरिबीची पाहणी केली. ग्रामीण भागातील तत्कालीन समाजात अत्यंत गरिबीची व दयनीय अवस्थेचे जीवन जगत होते. ग्रामीण भागातील लोक मोठ्या प्रमाणात अज्ञानी होते. या लोकांचे दारिद्र्य म्हणजे त्यांना अज्ञानपणा हे भाऊराव पाटील यांनी जाणले. या लोकांचे दारिद्र्य घालवायचे असेल तसेच त्यांच्या जीवनातील अनंत समस्या दूर करावयाच्या असतील तर त्यांना शिक्षण देण्याशिवाय पर्याय नाही. हा विचार त्यांच्या मनात आला आणि जनतेला शिक्षण मिळवून देणे हे आपले जिवीत कार्य मानले. शतकानुशतके शैक्षणिक सुविधांपासून वंचित असलेल्या दीनदुबळ्या गरीब जनतेला शिक्षण मिळवून देण्याकरिता त्यांनी १९१९ साली रयत शिक्षण संस्था स्थापन केली.

शाळा महाविद्यालये स्थापन करून चालणार नव्हते तर त्यासाठी विद्यार्थी वर्ग महत्त्वाचा होता म्हणून भाऊराव पाटील यांनी गावोगावी फिरून शेतकरी, दीनदुबळे यांची मनं वळवून त्यांच्या मुला-मुलींना शाळा महाविद्यालयात त्यांना दाखल केले. विद्यार्थ्यांना अशा प्रकारे एकत्रित आणून जीवनातील शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटवून सांगितले. अशा प्रकारे सामाजिक बंधुत्वाचे चित्र त्यांनी साक्षात घडविले व सामाजिक सुसंवाद प्रथम निर्माण केला.

**जात व पंथ विरहित वसतीगृह-** भाऊराव पाटील यांना जात व पंथाच्या नावावर प्रवेश देणारे वसतीगृह पसंत नव्हते म्हणून त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या सहाय्याने जात व पंथ लक्षात न घेता सर्वांना प्रवेश देणारे वसतीगृह आरंभ करून ग्रामीण भागातील गोरगरीब व सर्व जाती पथांच्या मुलांना तेथे प्रवेश दिला. याबाबत एक वैशिष्ट असे की त्यांनी वसतीगृहात प्रवेश दिलेला पहिला मुलगा 'महार' जातीचा होता. याबाबत त्यांना समाजाकडून कडाडून विरोध झाला परंतु विरोधाला न जुमानता त्यांनी हे कार्य नेटाने पुढे चालू ठेवले व सर्व जाती, धर्म पंथाच्या मुलामुलींना शिक्षण मिळवून दिले.

**प्रत्येक गावात शाळा असावी-** गाव तेथे शाळा असावी असे त्यांचे मत होते. एवढेच नव्हे तर या शाळेत प्रशिक्षित शिक्षक असावे तरच चांगल्या प्रकारचे गुणवत्ता पूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळेल, असा त्यांचा ठाम विश्वास होता आणि म्हणूनच त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्यामार्फत गाव तेथे प्राथमिक शाळा उघडण्यावर व प्रशिक्षण विद्यालये उघडण्यावर भर दिला व तो पूर्ण ही केला. शालांत शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून भाऊराव पाटील यांनी महाविद्यालयांचे जाळेही निर्माण केले.

**स्त्री शिक्षणाला प्राधान्य-** महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे यांच्या सारखेच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुद्धा स्त्री शिक्षणाला महत्त्व दिले. मुलींनाही प्राधान्य क्रमाने शाळा महाविद्यालयात प्रवेश देवून स्त्री शिक्षणाला प्रोत्साहित केले.

भाऊराव पाटील यांचा शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा अंतिम हेतू पिळवणूक रहित शिक्षण व एकसंघ भारतीय समाज निर्मितीचा होता. शिक्षणाबरोबर आंतर विवाहासही त्यांनी प्रोत्साहन दिले. अनेक जाती-एक वसतीगृह राबविणारे ते पहिले भारतीय होते.

**कमवा आणि शिका-** विद्यार्थ्यांना त्यांनी 'कमवा आणि शिका' असा स्वावलंबनाचा पाठ दिला. अगोदर कष्ट करायचे थोडा पैसा जमा करायचा व त्याच्या जोरावर शिक्षण घ्यायचे या विचारांचा त्यांनी गावोगावी फिरून प्रसार केला आणि लोकांमध्ये जागृती निर्माण करून शैक्षणिक कार्यासाठी कर्मवीरांनी मदत मिळविली. आम्हाला पडिक जमीन द्या आम्ही तिचे सुपीक जमिनीत रूपांतर करू, अशी क्रांतीकारी घोषणा भाऊराव पाटील यांनी केली. भाऊराव पाटील यांनी शिक्षण प्रसारात व सामाजिक चळवळीत केवळ भाषणेच केली नाहीत तर प्रत्यक्ष ती कृतीत उतरविली. शाळेत मुलांच्या स्वाध्यायावर भर तर दिलाच याशिवाय शेती हिशोब, प्रशासन यासारखे विषय अभ्यासक्रमात ठेवले.

कमवा आणि शिका व स्वावलंबी शिक्षण ही रयत शिक्षणाची मुलभूत तत्वे होत. कर्मवीरांना खरोखर विद्येचे शिक्षणाचार्य म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव व २६ जानेवारी १९५९ साली प्रजासत्ताक दिनापासून झाला. भारत सरकारने त्यांना त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल पदमभूषण पुरस्कार मोठ्या आदर व सन्मानाने बहाल केला. त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे लावलेले इवलेसे रोपटे आज प्रचंड वृक्षाच्या रूपात वाढलेले आहे. कर्मवीरांनी शिक्षणाचा बाजार केला नाही तर शिक्षण समाजाच्या प्रगतीसाठी प्रबोधनासाठी गुणवान समाज निर्मितीसाठी मानवी जीवनाच्या विकासासाठी व प्रगत करण्यासाठी वापरले. अशा या थोर शिक्षण महर्षीचे निधन ९ मे १९५९ रोजी पुणे येथे झाले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाऊरावांना विनम्र आदरांजली!

**-धोंडिरामसिंह राजपूत**

# प्रारूप विकास आराखडा याचिका सर्वोच्च न्यायालयातून खारीज; अन्याय ग्रस्तासाठी नवी संधी

छत्रपती संभाजीनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - महानगर क्षेत्रांतील प्रारूप विकास आराखडा आणि त्या मधील चुकांची दुरुस्ती नव्याने होउन प्रत्यक्ष स्थळ पाहणी करूनच नवा प्रारुप विकास आराखडा तयार करून गोरगरीब नागरिकांच्या राहत्या घरावरील आरक्षण, धार्मिक स्थळे नावे वगळणे, स्केल चुकवणे हे आणि महानगर पालिका क्षेत्रातील प्रारूप विकास आराखड्यातील अयोग्य आरक्षणावरून हजारो नागरिकांनी विरोध केला असुन त्यातच सातत्याने शहर विकासावर अत्यंत बारकाईने वॉच डॉग म्हणून लक्ष ठेवणारे जनआंदोलन विकास कृती समितीचे अध्यक्ष व शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील आणि त्यांचे सहकारी पदाधिकारी सातत्याने फॅक्ट फाइंडिंग म्हणजे सत्य शोधन अत्यंत अभ्यासु पद्धतीने निस्वार्थ पने अनेक वर्षा पासून करीत असुन त्यांनी या बाबत अत्यंत महत्त्वाचे व सविस्तर आक्षेप संपुर्ण शहरातील नागरीकांच्या वतीने विशेष नियुक्त अधिकारी श्रीकांत देशमुख यांच्याकडे सादर केला असून प्रारूप विकास आराखडा याचिका दि.६ मे २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालया तुन खारीज झाली असल्यामुळे ही अन्याय ग्रस्तासाठी नवी संधी असल्याचे प्रतिपादन जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केले असून सर्वोच्च न्यायालयातील याचिका कर्ते गोविंद नावपुते यांचे वरिष्ठ वकिलानी न्यायालयात आपले सविस्तर म्हणणे मांडले आणि ते ऐकुन घेतल्यावर न्यायलयाने पुढील आदेश दिले व याचिकाकर्त्याची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील उच्च न्यायालया समोर एक महत्त्वपूर्ण रिट याचिका दाखल करण्याच्या स्वातंत्र्यासह ही याचिका मागे घेण्याची परवानगी मागितली त्यानूसार परवानगी दिली आहे.विशेष सुट मागणी करणारी याचिका आणि त्यानुसार, मागितलेल्या स्वातंत्र्या सह याचीकाकर्त्याने मागे घेतल्याने सदरची याचीका फेटाळण्यात आली असल्याची बाब शहरातील नागरीकसाठी अधिकचा न्याय मिळवण्याची सुवर्ण संधी असून जनआंदोलन विकास कृती समितीचे अध्यक्ष व शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील आणि त्यांचे सहकारी पदाधिकारी जनते सोबत संपुर्ण ताकदीने उभे आहेत. नागरिकांच्या राहत्या घरावर येऊ घातलेले आरक्षण रद्द करण्यासाठी कंबर कसली असुन शहरातील नागरिकांच्या राहत्या घरावरील आरक्षणे, बांधकाम परवानगी असणारे घरावर आरक्षणे, खाजगी जागेवरील आरक्षणे, कब्रस्थान, स्मशान भुमी, प्ले ग्राउंड आरक्षण, रस्त्यासाठी आरक्षण तसेच अनेक स्मशान भुमी कब्रस्थान, धार्मिक स्थळे यांची नावेच या प्रारूप विकास आराखडा नकाशातून गायब असल्याचे अनेक प्रकरणे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी शोधुन काढली आहेत.

डेमोग्राफिक प्रोफाइल प्रमाणे अनेक चुका असून जनगणना मध्ये २०११-२०१५ दरम्यान फक्त ३६११ एवढीच वाढ दर्शविलेली आहे.सातारा देवळाई भागातील गुंठेवारीचा विषय सुद्धा योग्य निकष आणि प्रशासनिक तत्परता याचा अभाव असल्यामुळे नागरीक आक्रोश करीत असून त्यावर सुद्धा सर्व व्यापाक आणि कायदेशीर तोडगा जन आंदोलन विकास कृती समितीने काढला असुन समिती च्या बैठकीत यावर सर्व समावेशक व्यापक चर्चा होणार आहे.हा विकास आराखडा बनवला त्यांनी जमिनीवर येऊन काम केले नाही आणि ज्यांनी विकास आराखडा बनवला त्यांनी बंद खोलीत हा आराखडा तयार केला. त्यामुळे आज सर्वसामान्यांना त्रास सहन करावा लागत आहे. जन आक्रोश विचारात घेता आता तरी नव्याने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून नवा प्रारुप विकास आराखडा तयार करावा, अशी आग्रही मागणी जन आंदोलन विकास कृती समितीचे अध्यक्ष व शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी आणि समस्त पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# संपूर्ण भारतात मिड-माईल आणि लास्ट-माईल डिलिव्हरीसाठी eLCV तैनात करण्याकरिता स्विच मोबिलिटी आणि मॅजेन्टा मोबिलिटी यांची भागीदारी

मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी) - हिंदुजा समुहातील इलेक्ट्रिक बसेस आणि हलक्या वजनाची व्यावसायिक वाहनांची जागतिक उत्पादक कंपनी स्विच मोबिलिटी आणि एकात्मिक इलेक्ट्रिक मोबिलिटी सोल्युशन्स पुरवठादार मॅजेन्टा मोबिलिटी यांनी ५०० SWITCH IeV4 खरेदी करण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करून धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली. हा सहयोग शाश्वत वाहतुकीच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण मैलाचा दगड असून इलेक्ट्रिक वाहनांचा अवलंब करण्यासाठी दोन्ही संस्थांच्या सामायिक बांधिलकीला अधोरेखित करते. स्विच IeV4 इलेक्ट्रिक वाहनांच्या ५०० युनिट्सच्या खरेदीची रूपरेषा सादर करणाऱ्या सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी करून ही भागीदारी दृढ झाली आहे.

इलेक्ट्रिक दळणवळण परिक्षेत्रामध्ये क्रांती आणण्यासाठी सामूहिक समर्पित भावनेवर अधिक जोर देत ही घोषणा स्विच मोबिलिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश बाबू आणि मॅजेन्टा मोबिलिटीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मॅक्सन लुईस यांच्या हस्ते किल्ल्या देऊन आणि वाहन फ्लॅग ऑफ करून अनेक ग्राहकांच्या उपस्थितीत करण्यात आली.

स्विच मोबिलिटी लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. महेश बाबू म्हणाले. 'जागतिक शहरी दळणवळण परिक्षेत्रामध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या दिशेने परिवर्तन घडून येत असताना आम्ही स्विच मोबिलिटी या ऐतिहासिक बदलामध्ये सर्वात आघाडीवर असल्याचा आम्हाला अभिमान आहे. आमचे स्विच IeV4 हे ३.५ टन श्रेणीतील भारतातील पहिले eLCV असून कामगिरी उंचावण्यासाठी अत्याधुनिक ३१०V उच्च-व्होल्टेज आर्किटेक्चरवर त्याची बांधणी करण्यात आली आहे. उत्कृष्ट पेलोड, विस्तारित रेंज आणि जास्तीत जास्त व्हॉल्यूमेट्रिक स्पेससह हे वाहन लक्षणीयरित्या अधिक चांगले TCO सादर करते. शाश्वत भविष्याच्या दिशेने हे वाहन प्रगतीला चालना देत आहे.

मॅजेन्टा मोबिलिटी सोबतची धोरणात्मक भागीदारी अधिक चांगल्या, स्वच्छ भविष्यासाठी आमची बांधिलकी मजबूत करते. दळणवळणासंदर्भात आपल्या नाविन्यपूर्ण दृष्टिकोनासाठी प्रसिद्ध मॅजेन्टा मोबिलिटी आपल्या दृष्टीकोनाला पूरक असा डेटा-प्रणीत दृष्टीकोन सादर करते. हा सहयोग म्हणजे केवळ मॅजेंटाच्या ताफ्यात वाहनांची भर घालण्यापेक्षा अधिक असून गतिशीलतेच्या भविष्याला सक्षम करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि शाश्वत उपायसुविधा एकत्रित करून वाहतूक क्षेत्राला पुनर्परिभाषित करण्यासाठीचा एक महत्त्वपूर्ण क्षण आहे.'

या भागीदारीबद्दल उत्साह व्यक्त करताना मॅजेन्टा मोबिलिटीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मॅक्सन लुईस म्हणाले, 'भारतातील दळणवळण क्षेत्र डिकार्बोनाइज करण्याच्या आमच्या बंधीलकीला गती देण्यासाठी स्विच मोबिलिटीशी सहयोग करताना आम्हाला आनंद होत आहे. या सहयोगातून सुरक्षित, स्मार्ट आणि शाश्वत दळणवळण सुविधांच्या दिशेने बदल घडवून आणण्यासाठी असलेली अतूट बांधिलकी अधोरेखित होते. या eLCV सह, आम्ही आमच्या ग्राहकांना वाढीव पेलोड क्षमता देऊ शकू. आमच्या विद्यमान फ्लीट व्यवस्थापन, चार्जिंग आणि तंत्रज्ञान प्लॅटफॉर्मसह आम्ही दळणवळण क्षेत्राला इलेक्ट्रिकच्या दिशेने जाण्यासाठी एक मजबूत संधी सादर करू. आमच्या सहयोगाची ही फक्त सुरुवात आहे आणि एकत्रितपणे, भारतातील दळणवळण क्षेत्राचे भविष्य पुन्हा परिभाषित करण्याचे आमचे ध्येय आहे.'

या भागीदारीसह, मॅजेन्टा मोबिलिटी संपूर्ण भारतातील ग्राहकांसाठी लास्ट माईल आणि मिड माईल इंट्रा-सिटी ऑपरेशन्स वाढवण्याकरता स्विच मोबिलिटीचे व्यावसायिक इलेक्ट्रिक वाहनांमधील कौशल्य मिळविण्याचा प्रयत्न करत आहे. स्विच मोबिलिटीचे अत्याधुनिक इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञान आणि मॅजेन्टा मोबिलिटीचे लॉजिस्टिक, चार्जिंग आणि तंत्रज्ञान यांचा सर्वसमावेशक आणि नाविन्यपूर्ण सेवा पोर्टफोलिओ अखंडपणे एकत्रित करून हा सहयोग संपूर्णपणे ईव्ही दळणवळण आणि वाहतूक क्षेत्रात नवीन अग्रगण्य मानके प्रस्थापित करण्यासाठी तयार आहे.

स्विच IeV 4 ns 32.2 kWh बॅटरी आणि १७०० kg पेलोड क्षमता असलेले सक्षम इलेक्ट्रिक लाईट कमर्शियल वाहन (eLCV) (हलक्या वजनाचे व्यावसायिक वाहन) आहे. यातला कार्गो भाग प्रशस्त आहे आणि सुरक्षित, आरामदायी आणि कार्यक्षम गतीसाठी १२० किमीची रेंज देते. त्याची ६० kW मोटर आणि २३० Nm टॉर्क मजबूत कामगिरी सादर करते. स्विच iQN प्रणाली ही त्यांची स्वत:ची, कनेक्टेड तंत्रज्ञान टेलिमॅटिक्स सुविधा व्यवसायांना अधिक स्मार्ट आणि अधिक किफायतशीर फ्लीट ऑपरेशन्स साध्य करण्यात मदत करते.

ही वैशिष्ट्ये eLCV विभाग मजबूत करण्यासाठी मॅजेन्टा मोबिलिटीच्या आर्थिक वर्ष २४-२५ च्या विकास योजनांशी सुसंगत आहेत. हा सहयोग मॅजेन्टा मोबिलिटीच्या 'अब की बार दस हजार' कार्यक्रमाच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल असून सप्टेंबर २०२५ पर्यंत १०,००० इलेक्ट्रिक वाहने सादर करण्याचे उद्दिष्ट आहे. स्विच मोबिलिटी आणि मॅजेन्टा मोबिलिटी मधील सामंजस्य करार कामकाजीय उत्कृष्टता, पर्यावरण रक्षणाकडे बघण्याचा अग्रणी दृष्टीकोन आणि ग्राहकांच्या समाधानासह भारतातील शाश्वत शहरी दळणवळणाच्या दिशेने लक्षणीय बदल करण्याचा मार्ग मोकळा करतो.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरुणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्याचं नाव छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिवच !

## उच्च न्यायालयाचा राज्य सरकारला दिलासा

मुंबई दि.८ (प्रतिनिधी)- राज्य सरकारने औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्याचे नामकरण करण्याचा निर्णय घेतला होता. औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे नामकरण धाराशिव करण्यात आले होते. या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. मात्र राज्य सरकारचा हा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने वैध ठरविला आहे. राज्य सरकारचा हा निर्णय बेकायदेशीर नाही, असे उच्च न्यायालयाने म्हटले. राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाला अनेक याचिकांद्वारे आव्हान देण्यात आले होते. न्यायाधीश देवेंद्र उपाध्याय आणि न्यायाधीश आरीफ एस. डॉक्टर यांच्या खंडपीठाने या सर्व याचिका आज फेटाळल्या.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या कारकिर्दीतील अखेरच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जून २०२२ मध्ये औरंगाबादचे संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव आणि नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील असे नामकरण करण्याचा निर्णय झाला होता. पण ही प्रक्रिया नियमबाह्य असल्याचे कारण पुढे करीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने नामांतराच्या निर्णयाला स्थगिती दिली. त्यानंतर पुढच्याच महिन्यात औरंगाबादचे पुन्हा नामांतर करण्यात आले. यावेळी संभाजीनगर नावापुढे छत्रपती असे नामविशेष जोडून 'छत्रपती संभाजीनगर', असे नामकरण करण्यात आले.

जुलै २०२२ मध्ये शिंदे-फडणवीस सरकारने घेतलेल्या निर्णयाला फेब्रुवारी २०२३ मध्ये केंद्र सरकारने मंजुरी दिली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावेळी एक्स वर पोस्ट टाकून हा निर्णय घेतल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानले होते.

# मतदान केंद्रांवरील रुक्ष खोल्या झाल्या 'बाळसेदार'

## पाळणाघरांसाठी खेळण्या पाळण्यांची सज्जता

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- आई मतदान करत असेल तेव्हा तिच्या कडेवरील बालकाचा तितकावेळ सांभाळ करण्यासाठी मतदान केंद्रावर पाळणाघरांची सुविधा देण्यात येत आहे. त्यासाठी महिला व बालविकास सज्ज झाला आहे. या पाळणाघरांसाठी पाळणे, खेळणी, बेबी फुड इ. साहित्य जमा करणे सुरु झाले आहे. एरवी रुक्ष असणाऱ्या या खोल्या या खेळण्यांमुळे 'बाळसेदार' झाल्या आहेत.

जिल्ह्यात मतदान केंद्रांवर पाळणाघर स्थापित करण्यात येणार आहे. एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी निवडणूक यंत्रणा राबत आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी निर्देश दिल्यानुसार, एखादी माता मतदानासाठी आली असता तितकावेळ तिच्या कडेवरील बाळाचा चांगल्या पद्धतीने सांभाळ होणे अपेक्षित आहे. किंवा मतदार लहान मुलासह मतदानाला आल्यास त्या मतदाराला मतदान करण्यासाठी जितका वेळ लागेल तितका वेळ त्या बाळाला सांभाळण्यासाठी मतदान केंद्रांवर ही पाळणा घर सुविधा देण्यामागचा विचार आहे. त्यासाठी प्रत्येक पाळणाघर एका अंगणवाडी ताईंकडे सोपविले जाणार आहे. या ठिकाणी येणाऱ्या बालकाला तिथं अनेक खेळणी, झोपाळ्यात असलेल्या बालकांसाठी प्रत्यक्ष पाळणे जमा केले जात आहेत. हे पाळणे व खेळणे त्या त्या गावातील लोकांकडून जमा करण्यात आली आहे. याशिवाय बालकांना प्यायचे पाणी, बेबी फुड आदींची सज्जता ठेवण्यात आली आहे, असे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुवर्णा जाधव



यांनी सांगितले.

श्रीमती जाधव यांनी माहिती दिली की, जिल्ह्यात शहरी भागात १८० तर ग्रामिण भागात १६५० पाळणाघरे तयार करण्यात येत आहेत. ज्या इमारतीत अनेक मतदान केंद्र असतील तेथे त्या इमारतीत एक पाळणा घर असेल. प्रत्येक पाळणाघरावर एक याप्रमाणे अंगणवाडी ताईंची नियुक्ती आहे. मतदान केंद्र ज्या इमारतीत आहे तेथील नियोजित पाळणा घराच्या खोलीत हे साहित्य जमा करण्यात आले आहे. या बालकांच्या खेळणे इ. साहित्यामुळे या एरवी रुक्ष असणाऱ्या खोल्या बाळसं धरु लागल्या आहेत. आता गरज आहे ती बालकांच्या किलबिलाटाची. म्हणजेच मातांनी करावयाच्या मतदानाची.

# आपल्या पशुधनाला 'कर्ण बिल्ले' लावून घ्या; पशुसंवर्धन विभागाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- पशुपालकांनो आपल्या पशुधनाला कर्ण बिल्ले (इअर टॅगिंग) लावले का? लावले नसल्यास लावून घ्या. आपल्या जवळच्या पशुवैद्यक दवाखान्यात त्यासाठी संपर्क साधा. कारण येत्या १ जून पासून असे कर्ण बिल्ले नसलेल्या जनावरांची खरेदी विक्री करण्यास मनाई करण्यात आली असल्याचे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

जनावरांच्या कानात पशुसंवर्धन विभागाने दिलेले बिल्ले असल्याशिवाय आता यापुढे जनावरांची खरेदीविक्री करता येणार नाही,तसे होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यास प्रतिबंधित करावे,असे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

**इअर टॅगिंग' पशुसंवर्धन विभागाचा उपक्रम**

केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत नॅशनल डिजीटल लाईव्हस्टॉक मिशन अंतर्गत भारत पशुधन प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रणालीमध्ये पशुपालकांकडील सर्व पशुधनास इअर टॅगिंग (कानातील पिवळा बिल्ला) केल्यानंतर सर्व नोंदी ऑनलाईन करुन घेण्यास मदत होणार आहे. पशुवैद्यकीय दवाखान्यातील पशुवैद्यक हे पशुपालकाच्या गोठ्यात जाऊन जनावरांना 'इअर टॅगिंग' च्या नोंदी करुन घेणार आहेत.

**जनावरांच्या सर्व नोंदींचे डिजीटलायझेशन**

जनावराच्या जन्म-मृत्यु नोंदणी, प्रतिबंधात्मक लसीकरण, औषधोपचार, वंध्यत्व उपचार, मालकी हक्क हस्तांतरण या बाबीचा समावेश करण्यात आला आहे. या प्रणालीवर जिल्ह्यातील सर्व पशुधनाची प्रजनन आरोग्य, मालकी हक्क, जन्म मृत्यु इ. सर्व माहिती उपलब्ध होणार आहे. त्यासाठी पशुधनास कानास टॅग लावुन भारत पशुधन प्रणालीमध्ये नोंदणी आवश्यक आहे. त्यासाठी पशुपालकांनी नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. प्रदीप झोड तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. सुरेखा माने यांनी केले आहे.

**संसर्गजन्य रोग प्रतिबंधक उपाययोजनांसाठी उपयुक्त**

प्राण्यांमधील संकमण व सांसर्गिक रोंग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ अन्वये सर्व पशुधनाची सर्वकष माहिती एका ठिकाणी उपलब्ध व्हावी जेणे करुन पशुधनामधील सांसर्गिक रोगांना प्रतिबंध व नियंत्रण करण्यास मदत होईल. त्यानुसार, जिल्ह्यातील सर्व पशुधनाचे इअर टॅगींग करुन त्यांची नोंदणी भारत पशुधन प्रणालीवर करणे बंधनकारक



करण्याबाबत सर्व ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषद व अन्य सर्व संबंधित यंत्रणांना जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले आहेत.

इअर टॅग नसलेल्या पशुधनाची बाजार समित्या, आठवडी बाजार, गावागावातील खरेदी विक्री, बैलगाडा शर्यती इ.करण्यास दि.१ जून २०२४ पासून प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच जनावरांची जन्म, मृत्यू तसेच विक्रीबाबतच्या नोंदी भारत पशुधन प्रणालीवर घेणे बंधनकारक केले आहे.

**काय आहे इअर टॅगिंग?**

इअर टॅगिंगमध्ये जनावरांच्या कानात पिवळ्या रंगाचा एक प्लॅस्टिक बिल्ला (टॅग) लावला जातो. त्यात त्या जनावरांची ओळख दर्शविणारा १२ अंकी क्रमांक असतो. या क्रमांकाच्या आधारे, पशुवैद्यकीय दवाखान्यातील अधिकारी त्या जनावरांवर केलेल्या उपचार, लसीकरणाबाबत विविध नोंदी ऑनलाईन घेत असतात. या नोंदी भारत पशुधन पोर्टलवर अपलोड होत असतात. यापुढे पशुपालकांनी जनावरांची व्यवस्थित काळजी घेणे, विविध आजार, साथीच्या रोगापासून संरक्षण देणे, चोरी तस्करी पासून संरक्षण करणे, शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी, गैरप्रकारांना आळा घालणे अशा विविध बाबींसाठी या टॅगींगमुळे फायदा होईल.

# तलवार घेऊन दहशत पसरवणारे दोन गुन्हेगार हातकडीसह पोलिस ठाण्यातून पसार

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- तलवार घेऊन दहशत निर्माण करताना रंगेहाथ पकडलेल्या दोन गुंडांना ठाण्यात नेऊन बसवताच त्यांनी हातकडीसह ठाण्यातून पोबारा केला. मंगळवारी मध्यरात्री १२ वाजता ही घटना घडली. विकास दारासिंग जाधव (२३, रा. वरणगाव, ता. भुसावळ), सुनिल एकनाथ बेलदार उर्फ जाधव (२३, रा. धाबापिंपरी मुक्ताईनगर, जि. जळगाव) असे आरोपींचे नाव आहे.

गुन्हे शाखेचे सहायक निरीक्षक विनायक शेळके यांनी मंगळवारी रात्री उशिरा छावणी परिसरातून सुनिल व विकास ला शस्त्रांसह ताब्यात घेतले होते. पुढील कारवाईसाठी शेळके यांनी दोघांना छावणी पोलिस ठाण्यात हजर केले. दोघांना शस्त्र, आरोपींच्या कारसह कर्तव्यावर हजर सहायक फौजदार बन्सवाल यांच्या ताब्यात देऊन रितसर नोंद करुन निघून गेले. त्यानंतर बन्सवाल हे सहकारी कर्मचाऱ्यासह गुन्हा दाखल करण्यात व्यस्त असताना आरोपींनी लघुशंका आल्याचे नाटक केले. बन्सवाल यांनी मात्र दोघांची हातकडी काढून कुठल्याही सुरक्षेशिवाय बाथरुमच्या दिशेने पाठवले. दोघांनी मात्र ठाण्याच्या मागील बाजुने तत्काळ हातकडीसह पोबारा केला. याप्रकरणी उपनिरीक्षक सुरेश माळी यांच्या तक्रारीवरुन पहाटे गुन्हा दाखल करण्यात आला. बुधवारी उशिरापर्यंत त्यांचा शोध सुरू होता.

# पिक विम्याच्या मागणीसाठी शेतकऱ्यांचा तहसीलदार व विमा प्रतिनिधी यांना घेराव

## पैसे न मिळाल्यास सार्वजनिक फाशी आंदोलनाचा दिला इशारा

गंगापुर दि.८ (प्रतिनीधी)- ११ तारखेपर्यंत पिकविम्याचे पैसे शेतकऱ्यांचा खात्यांवर आले नाही तर १३ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे.दोन दिवसांत विम्याची रक्कम देणार असल्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांनी तहसीलदार यांचे कार्यालय सोडले.

गंगापूर तालुक्यातील जामगाव भेंडाळा मंडळातील शेतकऱ्यांना पिक विमा पासून वंचीत ठेवल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेत ८ में रोजी १२ वाजता गंगापुर तहसिलदार यांच्या कॅबिनचा ताबा घेतला यावेळी तहसील कार्यालयात एकच गोंधळ उडाला.

यापूर्वी या भागातील शेतकऱ्यांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला होता.परंतु प्रशासनाकडून कोणतीही दखल न घेतल्यामुळे आज शेतकऱ्यांनी तहसील



कार्यालयाचा ताबा घेत पिक विमा कर्मचारी हेमंत शिंदे व अपर तहसीलदार आकाश दहादडे ,नायब तहसीलदार गौरव खैरनार व कार्यातील कर्मचाऱ्यांना धारेवर धरले या आंदोलनात भाऊसाहेब गवळी कायगावकर, ज्ञानेश्वर गायकवाड, संजय गायकवाड, रामदास माने, सदानंद गायकवाड, बापूसाहेब गायकवाड, संतोष गायकवाड, बाळासाहेब भोगे, इसाक पटेल, गणेश चव्हाण, गोकुळ बोरुडे, ओंकार बोरुडे,भागचंद नजन, अनिल घुंगाशे, नारायण वायसळ, दिनेश भोगे, सुनील निरपळ, कैलास निकम, श्यामभाऊ दाणे ,साईनाथ माने, दत्तात्रय माने, अण्णासाहेब वाडकर ,अनिल मोरे ,मच्छिंद्र तागड गणेश मोरे, दिगंबर क्षीरसागर, ऋषिकेश चव्हाण, अविनाश चव्हाण, नवाज पटेल,मासुम पठाण,यावेळी मोठ्या संख्येने शेतकऱ्यांची उपस्थिती होती.पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# सर्वसामान्य शेतकरी पुत्राची प्रचारासाठी चंद्रकांत खैरे यांना एक लाख रुपयांची मदत

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- गेल्या अनेक वर्षांपासून जनतेची सेवा चंद्रकांत खैरे करत आहे. सत्तेत असो वा नसो खैरे मदतीला धावून जातात हा अनुभव अनेकांना आला. आता मात्र निवडणूक असल्याने महागाईच्या झळा सर्वांना बसत आहे. याची जाणीव झाल्याने हर्सूल येथील सर्वसामान्य शेतकरी नारायण सुरे यांनी प्रचारासाठी चंद्रकांत खैरे यांना एक लाख रुपयांची मदत केल्याने अनेकांच्या भुवाया उंचावल्या.

यावेळी महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांना सर्वच स्तरातून होईल तितकी मदत करत आहे. त्यामुळे माझी निवडणूक जनतेने हातात घेतली, हीच माझी शक्ती असल्याचे खैरे यांनी सांगितले. अडचणीच्या काळात सर्वसामान्य बळीराजाकडून धनादेश स्वीकारताना खैरे मात्र भावुक झाले. नारायण सुरे यांची हर्सूल परिसरात शेती असून, त्यांनी यापूर्वी अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहे. हरसिद्धी माता मंदीरात सुशोभीकरण कामासाठी मदत केली होती.

# मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुटी

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी विविध आस्थापनांनी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुटी द्यावी,असे आवाहन कामगार उपायुक्त चंद्रकांत राऊत यांनी केले आहे.

यासंदर्भात उद्योग उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केलेल्या शासन परिपत्रकात नमूद केल्यानुसार, निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुटी देण्यात यावी. निवडणूकीच्या दिवशी हे कामगार निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरी त्यांनाही सुटी देण्यात यावी. सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या, संस्था, औद्योगिक उपक्रम आणि इतर आस्थापनांना ही सुटी लागू राहील. अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवस सुटी देणे शक्य नसल्यास दोन तासाची सवलत देण्यात यावी. त्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना दोन तासांची सवलत मिळेल व कोणीही मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घ्यावी. १९- औरंगाबाद लोकसभा मतदार संघ सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी सोमवार दि.१३ ओजी मतदान होणार आहे. या क्षेत्रातील कार्यरत उद्योग, खाजगी आस्थापना, उद्योग समूह, महामंडळे. कंपन्या संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना, कामगारांना सुटी द्यावी. या संदर्भात उद्भवणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी कामगार उपायुक्त कार्यालयात तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला असून कामगार, कामगार संघटनांनी ०२४०-२३३४६०३ वर संपर्क साधावा,असे आवाहन कामगार उपायुक्त चंद्रकांत राऊत यांनी केले आहे.

# आचार्य गुप्तीनंदी गुरुदेव यांच्या सान्निध्यात धर्मतिर्थ क्षेत्रावर अक्षय तृतीया निमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.८ (प्रतिनिधी)- प.पु.आर्शमार्ग संरक्षक दिगंबर जैनाचार्य गुप्तीनंदी गुरुदेव ससंघ सानिध्यात अक्षय तृतीयाचे औचित्य साधुन कचनेर जवळील श्री.धर्मतीर्थ क्षेत्रावर दिनांक १० मे रोजी विविध धार्मिक कार्यकमांचे आयोजन करण्यात आले असुन सर्वप्रथम सकाळी ७ ते ९ वा.भगवंताचा पँचामृत अभिषेक,इक्शुरसाने महाशांतीधारा ,इच्छापूरक आदिनाथ अक्षय तृतीया विधान,तसेच यावेळी गर्भ संस्कार अनुष्ठान, गर्भ संस्कार विधान, व गर्भ संस्कार विधीमंत्रानुष्ठान होणार आहे दुपारी १ ते ३ या वेळेत होणार आहे. तसेच यावेळी अक्षय तृतीयाचे औचित्य साधुन लहान मुला मुलींना विदया रिध्दी मंत्र संस्कार,नवयुवती युवकांसाठी इच्छापूरक भाग्योदय मंत्र संस्कार, गृहसफलतेचा गुरू मंत्र, तसेच नौकरी किंवा व्यापारिक कार्यामध्ये सफलता हेतु लक्ष्मी लाभ मंत्र, आणि सर्वांसाठी सर्वकार्य सिद्धि मंत्राचे संस्कार केले जाइल. आचार्यश्रीचे अक्षय तृतीया निमीत्त भगवान आदीनाथांवर विशेष प्रवचन व पादप्रक्षालन हा कार्यकम आंतरराष्ट्रीय स्तरावर होणार आहे.संपूर्ण कार्यक्रमाचा लाइव प्रसारण पारस चेनल वर होणार आहे तसेच यावेळी ऑनलाईन संस्कार सुध्दा करण्यात येणार आहे. या कार्यासाठी विधानाचार्य म्हणुन पंडित शितल उपाध्ये इंरडोली यांचे सहकार्य मिळाले आहे. या कार्यक्रमाचा उद्घाटन ग्लोबल जैन महासभाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमनालाल हपावत मुंबई, विजेंदर निर्मल जैन गुरुग्राम, सौधर्म इंद्र प्रमोद संजय जैन बाराबंकी, महावीर प्रसाद अग्रवाल बाराबंकी, अमित जैन हैदराबाद, संजीव जैन लखनऊ, नितिन जैन दिल्ली महावीर काला विहामांडवा आदि अनेक पुण्यार्जक परिवार हस्ते होणार आहे.

तरी समाज बांधवानी वरील कार्यकमास धर्मतीर्थ क्षेत्र झूम आईडी वर आनलाईन मोठया संख्येने उपस्थित रहावे व ऑनलाईन कार्यकमाला लाभ घ्यावा असे आवाहन धर्मराजश्री तपोभमी दिंगबर जैन ट्रस्ट धर्मतीर्थ क्षेत्र विकास समितीने केले असल्याची माहिती अध्यक्ष चंद्रशेखर पाटणी, वरीष्ठ उपाध्यक्ष संजय पापडीवाल, उपाध्यक्ष राजेंद्र पाटणी, महामंत्री पवन पापडीवाल, कोषाध्यक्ष गुलाबचंद कासलीवाल, मार्गदर्शन सुनिल काला, प्रकाश अजमेरा, अरुण पाटणी, सतिश लोहाडे, धिरज पाटणी आदींनी केले असल्याची माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.

(पान १ वरुन)

## अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील

रणनीती ठरवताना सामूहिक पद्धतीने निर्णय घेतला जाईल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये फूट पडल्यानंतर अजित पवार हे भारतीय जनता पक्षासोबत एनडीए मध्ये सामील झाले आहेत. त्यांच्यासोबतच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निवडणूक चिन्ह आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे नाव देखील अजित पवार यांना मिळाले आहे. त्यानंतर शरद पवार देखील भाजप सोबत जातील का? असा प्रश्न उपस्थित केला जात होता. मात्र, शरद पवार यांनी भाजप सोबत जाण्यास स्पष्ट नकार दिला आहे. या मुलाखतीमध्ये देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी जुळवून घेणे किंवा त्यांचे विचार पचणी पडणे हे आमच्यासाठी अवघड असल्याचे शरद पवार यांनी सांगितले आहे. त्यामुळे शरद पवार यांच्या याबाबत आता विविध चर्चा रंगल्या आहेत.

## इंडी आघाडीकडे नेता नाही, नियत नाही...

जगात जाणार असून जालन्याचा डंका जगात वाजणार आहे. हे काम मोदी सरकारने केले. औरंगाबादचे नामांतर करण्याचे काम मोदी सरकारने केले. ज्यांनी संभाजीनगर नावास विरोध केला, त्या काँग्रेस आणि शरद पवारांसोबत गेलेल्या उद्धव ठाकरेंना तुम्ही याचा जाब विचारला पाहिजे, कारण त्यांनी या प्रस्तावाचे स्वागतही केले नाही, असेही शाह म्हणाले. राम मंदिर, कलम ३७०, तिहेरी तलाक, याबाबत उद्धव ठाकरेंना जनतेने सवाल केले पाहिजेत. ते यावर बोलणार नाहीत, कारण ते काँग्रेस, शरद पवारांच्या मांडीला मांडी लावून बसले आहेत. उद्धव ठाकरेंनी पदाच्या लालसेने या लोकांसोबत जाणे पसंत केले. अलीकडे पाकिस्तान सतत राहुल गांधींचे समर्थन करत आहे. मोदी सर्जिकल स्ट्राईक करतात, तेव्हा राहुल गांधी प्रश्न उपस्थित करतात, मोदी जेव्हा जेव्हा देशहिताचे निर्णय घेतात, तेव्हा राहुल गांधी सवाल उपस्थित करतात, पाकिस्तानचा अजेंडा चालविणारे राहुल गांधी आणि काँग्रेस पक्ष पुन्हा सत्तेवर आले, तर राम मंदिरावरही बाबरी नावाचे कुलूप लावण्याचे पाप काँग्रेस व इंडीचे नेते करतील, असा इशाराही त्यांनी दिला.

## मतदान केंद्रातील व्हिडिओ रेकॉर्डिंग जतन...

करून ठेवावे, अशी मागणी शेतकरी नेते आणि बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार रविकांत तुपकर यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

बुलढाणा लोकसभेतील अपक्ष उमेदवार रविकांत तुपकर यांनी या संदर्भातील निवेदन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निवडणूक आयोगाकडे पाठविले आहे. या निवेदनात नमूद आहे की, मी स्वतः अपक्ष म्हणून पाना या चिन्हावर लोकसभेची निवडणूक लढविली आहे. २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान पार पडले आहे. मतदानाच्या मतदान कक्षामध्ये मतदान निपक्षपातीपणे, मोकळ्या वातावरणात आणि कायदेशीरपणे पार पडते आहे किंवा नाही हे तपासून पाहण्यासाठी सर्व मतदान कक्षांमध्ये मतदानाच्या व्हिडिओ रेकॉर्डिंग करावे, असे निर्देश माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत.